**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग भूम (न्यायालय क्र.२)**

नि.फौज.खटला क्र.१५२/२०२०
शासन वि. अविनाश
**निशानी क्र.१६**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.जे.जे.सरवदे यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :– | गोरख दगडू आहेर |
| माझे वय सुमारे | :– | ४८ वर्षे |
| माझा व्यवसाय | :– | शेती |
| माझे राहण्याचे ठिकाण | :– | डोकेवाडी, ता.भूम, जि.उस्मानाबाद |

**०१.** मी शेतातून डोकेवाडीच्या स्टॅन्डवर आलो होतो. तेथे माणसे जमा झाली होती. तेथे पोलीसांनी माझ्या सहया घेतल्या. तेथे माझ्यासोबत कोण होते मला आठवत नाही. आता मला पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराविषयी मला सांगता येणार नाही. सहीस **निशानी १७** देण्यात येते. मला आता घटनास्थळावरील फोटो दाखवण्यात आले. त्यामध्ये फिर्यादी, दुसरे पंच, पोलीस व मी आहे. फोटोस **आर्टीकल अ** देण्यात येते.

**साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नाही म्हणून त्यांस फितुर घोषीत करण्याची परवानागी मागितली. ती मंजुर करण्यात आली. उलटतपासास परवानगी मागितली ती मंजुर करण्यात आली म्हणून सरकार पक्षातर्फे उलटतपास श्री. जे.जे.सरवदे यांचेतर्फे:**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, मला वाशी पोलीसांनी डोकेवाडीच्या स्टॅन्डवर घटनास्थळाचा पंचनामा करण्याकरता बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस दुसरे पंच गोरख श्रीरंग साळुंके हे माझ्यासोबत होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी दादा साळुंके

यांनी आम्हाला घटनास्थळ दाखवले होते. हे म्हणणे खरे आहे की, तेथे फिर्यादीला मारहाण केलेली काठी पोलीसांनी माझ्या समक्ष जप्त केली होती. हे म्हणणे खरे आहे की, तेथे पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करुन त्यावर मी सही केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. तो तोच आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **निशानी १७** देण्यात येते. आता मला जप्त केलेली काठी दाखवली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. काठीला **आर्टीकल ब** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. टी.एल.हड्डुळे –**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनामा माझ्या समक्ष केला नाही व तो कशाचा आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांच्या भितीपोटी मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल ब वरील काठी ही काठी नसुन फावडयाचा दांडा आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला व तो मला वाचून दाखवला हे मी खोटे सांगीतले. हे म्हणणे खरे आहे की, काठी माझ्या समक्ष जप्त केली नाही.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

स्वाक्षरीत/–

दिनांक ११.०८.२०२५

**( श्रीमती अश्लेषा एस. मते )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भूम.
(न्यायालय क्र.२)

<u>**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग भूम (न्यायालय क्र.२)**</u>

नि.फौज.खटला क्र.१५२/२०२०
शासन वि. अविनाश
**निशानी क्र.१८**

<u>**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.जे.जे.सरवदे यांचे मार्फत शपथेवर सुरु –**</u>

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :- | गोरख श्रीरंग साळुंके |
| माझे वय सुमारे | :- | ६० वर्षे |
| माझा व्यवसाय | :- | शेती |
| माझे राहण्याचे ठिकाण | :- | डोकेवाडी, ता.भूम, जि.उस्मानाबाद |

**०१.** मला कोणी, कुठे व कशासाठी बोलावले होते हे आता माझ्या लक्षात नाही. घटनेबद्दल मला काही माहिती नाही. मी कशावर सही केली होती की नाही हे आता माझ्या लक्षात नाही. आता मला निशानी १७ वरील घटनास्थळ पंचनामा वरील सही दाखवण्यात आली. ती माझीच सही आहे. सहीस **निशानी १९** देण्यात येते. आता मला आर्टीकल अ वरील फोटो दाखवण्यात आला. त्यामध्ये मी, दुसरा पंच, पोलीस आहेत. त्यामध्ये इतर कोण आहे हे मला सांगता येणार नाही.

<u>**साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नाही म्हणून त्यांस फितुर घोषीत करण्याची परवानागी मागितली. ती मंजुर करण्यात आली. उलटतपासास परवानगी मागितली ती मंजुर करण्यात आली म्हणून सरकार पक्षातर्फे उलटतपास श्री. जे.जे.सरवदे यांचेतर्फे:**</u>

**०२.** मला वाशी पोलीसांनी दिनांक २८.१०.२०२० रोजी बसस्टॅन्डवर पंचनामा करता बोलावले होते की नाही हे आता मला आठवत नाही. गोरख दगडू आहेर हे माझ्यासोबत होते की नाही हे आता माझ्या लक्षात नाही. तेथे माझ्या समक्ष लाकडी काठी

जप्त केली होती की नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला होता व तो मला वाचून दाखवला होता. अविनाश आहेरला मी ओळखतो. तो माझ्या गावातील आहे. हे म्हणणे खरे नाही की, अविनाशची व माझी चांगली ओळख आहे व त्याची केसमधून सुटका व्हावी म्हणून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. टी.एल.हडुळे यांनी साक्षीदारचा उलटतपास नाकारला.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

स्वाक्षरीत/-

दिनांक ११.०८.२०२५

**( श्रीमती अश्लेषा एस. मते )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भूम.
(न्यायालय क्र.२)